Monday, the 21st June, 2021

RNI No. MAHENG /2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ६, अंक ४८(५)] सोमवार, डिसेंबर २८, २०२०/पौष ७, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक १०३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Public Universities (Second Amendment) Act, 2020 (Mah. Act No. XXXIV of 2020), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

BHUPENDRA M. GURAO,
I/c. Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

---

### MAHARASHTRA ACT NO. XXXIV OF 2020

(First published, after having received the assent of the Governor in the "*Maharashtra Government Gazette*", on the 28th December 2020).

*An Act further to amend the Maharashtra Public Universities Act, 2016.*

**WHEREAS** both Houses of the State Legislature were not in session;

**AND WHEREAS** the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Public Universities Act, 2016, for the purposes hereinafter appearing ; and therefore, promulgated the Maharashtra Public Universities (Second Amendment) Ordinance, 2020, on the 8th December 2020 ;

Mah. VI of 2017.

Mah. Ord. XXI of 2020.

**AND WHEREAS,** it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature; it is hereby enacted in the Seventy-first Year of the Republic of India as follows :–

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Public Universities (Second Amendment) Act, 2020.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 8th December 2020.

Amendment of section 109 of Mah. VI of 2017.

**2.** In section 109 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (hereinafter referred to as "the principal Act"), Mah. VI of 2017.–

(*1*) in sub-section (*3*), in clause (*d*), after the second proviso, the following proviso shall be inserted, namely :—

"Provided further that, with a view to extend the date of making application for opening a new college or institution of higher learning, scrutiny of application by Board of Deans and forwarding with the approval of Management Council to the State Government and grant of a Letter of Intent by the State Government, for the year 2020-2021, the day or dates referred to in clauses (*a*), (*c*) and (*d*) of sub-section (*3*), as specified in column (2) of the Table hereto, shall be read as provided in column (*3*) of the said Table :—

| Clauses | day or date provided in existing provision | Day or date provided for Academic Year 2021-22 |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| *(a)* | before the last day of September of the year preceding the year in which the Letter of Intent is sought. | on or before 31st December 2020 |
| *(c)* | on or before 30th of November of the year in which such application is received by the University. | on or before 28th February 2021 |
| *(d)* | on or before 31st January of the immediately following year. | on or before 15th April 2021." ; |

(*2*) in sub-section (*4*), after clause (*a*), the following proviso shall be inserted, namely :—

"Provided that, the Management seeking permission to start a new course of study, subject, faculty, additional division or satellite center from academic year 2021-22, may apply to the Registrar on or before the 31st December 2020.".

Repeal of Mah. Ord. XXI of 2020 and saving.

**3.** (*1*) The Maharashtra Public Universities (Second Amendnent) Ordinance, 2020, is hereby repealed. Mah. Ord. XXI of 2020.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the corresponding provisions of the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHBIL/2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ६, अंक ३६(५)] सोमवार, डिसेंबर २८, २०२०/पौष ७, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ५७

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४.**— महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम . . . . . | पृष्ठे १-२ |


दिनांक २४ डिसेंबर २०२० रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

भूपेन्द्र मु. गुरव,
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २८ डिसेंबर २०२० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

२०१७ चा महा. ६.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक

२०२० चा महा. अध्या. २१.

८ डिसेंबर २०२० रोजी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२० प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२० असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ८ डिसेंबर २०२० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०१७ चा अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १०९ मधील,— २०१७ चा महा. ६.

(१) पोट-कलम (३) मध्ये, खंड (घ) मधील दुस-या परंतुकानंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल:—

"परंतु आणखी असे की, उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी अर्ज करण्याचा, अधिष्ठाता मंडळाकडून अर्जाची छाननी करणे व व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसह राज्य शासनाकडे पाठविण्याचा आणि राज्य शासनाकडून इरादा पत्र देण्याचा दिनांक, २०२०-२०२१ या वर्षासाठी, वाढविण्याच्या दृष्टीने, यातील तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (३) च्या खंड (क), (ग) व (घ) मध्ये विनिर्दिष्ट केलेला दिवस किंवा दिनांक हे, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वाचण्यात येतील:—

| खंड | विद्यमान तरतुदीमध्ये तरतूद केलेला दिवस किंवा दिनांक | २०२१-२२ या वर्षासाठी तरतूद केलेला दिवस किंवा दिनांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (क) | ज्यावर्षी इरादा पत्र मागवले असेल त्या वर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी. | ३१ डिसेंबर २०२० रोजी किंवा त्यापूर्वी. |
| (ग) | ज्यावर्षी असा अर्ज विद्यापीठाला प्राप्त झाला असेल त्या वर्षाच्या ३० नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी. | २८ फेब्रुवारी २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी. |
| (घ) | लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी. | १५ एप्रिल २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी."; |

(२) पोट-कलम (४) मध्ये, खंड (क) नंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :

"परंतु, २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापासून, नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी किंवा सॅटेलाइट केंद्र सुरू करण्याकरिता परवानगी मागणा-या व्यवस्थापनास, ३१ डिसेंबर २०२० रोजी किंवा त्यापूर्वी कुलसचिवाकडे अर्ज करता येईल.".

सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २१ याचे निरसन व व्यावृत्ती.

३. (१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२० हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२० चा महा. अध्या. २१.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिति, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.